# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 260/2022 दिनांक : 02.07.2022**

## 1)खुनः–

**माळाकोळी :–**दिनांक 30.06.2022 रोजी चे 14.00 वा. चे सुमारास, **आरोपीचे शेतात मौजे खेडकरवाडी शिवार ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे हावगी नारायण कल्याणे, वय 55 वर्षे, रा. खेडकरवाडी ता. लोहा जि. नांदेड**, यास यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन शेती पेरणीचे व वाटणीचे कारणावरुन मयतास शिवीगाळ करुन मारहाण केली व जमिनीवर पाडुन पाय बांधले व दोरीने गळा आवळुन खुन केला. वगैरे **फिर्यादी प्रभाकर घनश्याम वलांडे, वय 51 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. खेडकरवाडी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरन 72/2022 कलम 302,504,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री डोके, मो.नं. 8652147575** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 01.07.2022 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **काळेश्वर मंदीर विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्याचा मित्र यांनी यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी व त्याचा मित्राचा शर्ट धरुन मारहाण केली व खंजरचा धाक दाखवुन दोघांजवळील दोन मोबाईल एकुण कि.अ. 32,000/– रुपयाचे जबरीने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी अभिषेक दादाराव पाईकराव वय 19 वर्षे, रा. शिवनेरी नगर जुना पेडगाव रोड परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 389/2022 कलम 392,323,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री कोरे**, **मो.क्रं. 8888836607** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :–

**भोकर :–**दिनांक 01.07.2022 रोजी 15.00 वा. ते 15.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरामध्ये पवार कॉलनी अष्टविनायक नगर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई आपल्या घरामध्ये किचन वटा साफ करीत असताना एक अनोळखी इसम घरात प्रवेश करुन त्यास आवाज दिला असता त्याने काहिएक न बोलता स्टोर रुमच्या पाठीमागे जावून आडोसा घेतला व घरातील पाहणी केली असता कपाटातील नगदी 28,000/–रूपये दिसुन आले नसल्याने नमुद आरोपीने चोरी केली असावी. वगैरे **फिर्यादी नंदकुमार दत्तात्रय पद्मवार वय 61 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. पवार कॉलनी, अष्टविनायक नगर, भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 239/2022 कलम 354,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री प्रल्हाद बाचेवाड, मो.क्रं. 9284497645** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**मुदखेड :–** दिनांक 28.06.2022 रोजी 21.30 वा. ते दिनांक 29.06.2022 रोजी 03.00 वा. चे दरम्यान, **राठोड हॉस्पीटल उमरी रोड मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा युनिकॉन कंपनीची लाल रंगाची मो. सा. क्रं. एम.एच.–26/बीवाय–8352 किमती 70,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी जगदीश शिवाजी राठोड, वय 31 वर्षे, व्यवसाय डॉक्टर रा. चिकाळा तांडा ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 141/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1375, मो.क्र. 02462–236510** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**1)हिमायतनगर :–**दिनांक 01.07.2022 रोजी 05.00 वा. चे सुमारास, **कृषी उत्पन्न बाजार समिती समोर हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा आपल्या ट्रकमध्ये दरवाजा बंद करुन झोपला असता त्याने सकाळी उठुन पाहिले असता त्याच्या ट्रकच्या कॅबिनचा दरवाजा उघडा दिसला व त्यांचा व्हिओ कंपनीचा मोबाईल किंमती 8000/–रुपयाचा व नगदी 2800/–रूपये यातील नमुद आरोपीने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी प्रशांत रमेश कांगणे वय 24 वर्षे, व्यवसाय ट्रक चालक रा. निचपुर ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 162/2022 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2303 सिंगनवाड**, **मो. क्रं. 9049078521** हे करीत आहेत.

**2)हदगाव :—**दिनांक 22.06.2022 रोजी 08.00 वा. चे सुमारास, **नागोराव सखाराम देशमुख यांचे शेतात शिरड शिवारात ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील एम.एस.ई.बी. ची अल्युमिनियम ची लघुदाब वाहिनीची तार अंदाजे 2400 फुट लांबीची किंमती 35,000/—रुपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी संजय रामाजी महानूर वय 35 वर्षे, व्यवसाय नौकरी सहा. अभियंता महावितरण शाखा निवघा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 208/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/900 सातपुते, मो.क्रं. 8329976264** हे करीत आहेत.

**3)नांदेड ग्रामीण :—**दिनांक 01.06.2022 रोजी 10.30 वा. ते 15.30 वा. चे दरम्यान, **होळकर निवास सहयोग कॅम्पस जवळ विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांनी रुमला कुलूप न लावता कॉलेज ला गेले व कॉलेज करुन रुमवर आले असता त्यांचा लिनीओ कंपनीचा लॅपटॉप कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी ऋषिकेश बालाती सरोदे वय 21 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. पिंपरखेड ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 388/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री गणपत गिते, मो.क्रं. 9158762002** हे करीत आहेत.

# 5)रेती चोरी :—

**मांडवी :—**दिनांक 20.08.2021 ते दिनांक 20.02.2022 रोजी चे दरम्यान, **मौजे टेंभी तांडा येथील सरकारी गायरान व बोध येथील सरकारी गायरान जमीन ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयाने नमुद ठिकाण सरकारी गायरान येथील अवैध रेती साठा एकुण 129 ब्रास रेती एकुण किंमती 5,38,575/—रूपयाची चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी अशोक मारुती सावरकर वय 52 वर्षे, व्यवसाय पोलीस पाटील रा. पाथरी ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मांडवी** गुरनं 55/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1657 जांबुवंत कदम, मो.क्रं. 7218242057** हे करीत आहेत.

# 6)जनावर चोरी :—

**सिंदखेड :—**दिनांक 28.06.2022 रोजी 01.00 ते 02.30 वा. चे दरम्यान, **मौजे गोकुळ गोंडेगाव ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीच्या लहान मोठया एकुण 25 ते 30 बकऱ्या किंमती 1,00,000/—रुपयाच्या कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेल्या. वगैरे **फिर्यादी श्रीकांत सुभाष कांबळे, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. गोकुळ गोंडेगाव ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 81/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2356 चौहाण , मो.क्र. 7350860891** हे करीत आहेत.

# 7)शासकीय कामात अडथळा :—

**विमानतळ :—** दिनांक 30.06.2022 रोजी 15.30 वा. सुमारास, **नमस्कार चौक ते महाराणा प्रताप चौक जाणारा रोडवर, नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा त्याचे ताब्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे शासकीय बस क्रं. एम.एच./20—बी.एल.—3995 हि चालवित असतांना यांतील स्विप्ट डिझायर कार क्रं. एम.एच./04—जीडी—2136 च्या कार चालकाने शिवीगाळ करुन थापडबुक्याने, काठने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी देवून शासकीय कामात अडथळा निर्माण केला.वगैरे **फिर्यादी साईनाथ बाबूराव किरतवाड वय 47 वर्षे व्यवसाय बसचालक रा. पातळगंगा ता. कंधार जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 223/2022 कलम 353,332,504,506 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1792 लोखंडे, मो.क्रं. 9527810006** हे करीत आहेत.

# 8)विवाहीतेचा छळ :—

**मुक्रमाबाद :—** मागील दिड वर्ष ते आज पावेतो, **सुगाव ता. देगलुर जि. नांदेड ह.मु. हातराळ ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझ्या माहेरहुन एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन मारहाण करुन शारिरीक व मानसिक छळ केला व घरबाहेर हाकलून दिले. वगैरे **फिर्यादी** 20 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रमाबाद** गुरनं 155/2022 कलम 498(अ),323,5046,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1677 ताहेर शेख, मो.क्रं. 8421437070** हे करीत आहेत.

# 7)फसवणुक :—

**1)शिवाजीनगर :—** दिनांक 07.12.2019 रोजी 11.30 वा. ते दिनांक 01.07.2022 रोजी 23.00 वा. चे दरम्यान, **दुय्यम निबंधक कार्यालय, नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचा विश्वासघात बनावट कागदपत्राच्या आधारे खरे आहेत असे भासवून विकसन करारनामा दुय्यम निबंधक कार्यालय, नांदेड येथे नोंदणीकृत करुन फिर्यादीस आर्थिक नुकसान करण्याच्या उद्देशाने व फिर्यादीची मालमत्ता हडप करण्याचे उद्देशाने फसवणुक केली. वगैरे वरुन मा. न्यायालयाचे आदेशाने सी.आर.पी.सी. कलम 156 (3) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. **फिर्यादी रमेश व्यंकागौड केसरे, वय 51 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. काबरानगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 251/2022 कलम 407,420,468,471,415,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो. नं. 9970073425** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :—** दिनांक 12.03.2018 रोजी 10.00 वा. ते दिनांक 16.03.2018 रोजी 17.00 वा. चे दरम्यान, **भारतीय स्टेट बॅक, औदयोगिक वसाहत, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांची हिरा ग्रुपची संचालिका नवहिरा शेख तसेच त्यांचे संचालक/व्यवस्थापन प्रवर्तक एजंट यांनी संगणमत करुन आमची फसवणुक व विश्वासघात करुन गुंतवणुकदारांना रक्कम परत न करता आमची फसवणुक करुन रकमेचा अपहार व भ्रष्टाचार केला. वगैरे वरुन मा. न्यायालयाचे आदेशाने सी.आर.पी.सी. कलम 156 (3) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. **फिर्यादी मोहम्मद इब्राहिम मोहम्मद यासीन, रा. मकदुमनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 249/2022 कलम 420,409,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.नं. 9970073425** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड